मा. अति. महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका.
ठराव क्र. :-१/२०७
दिनांक :- ०४/०८/२०२०

अति.महा. आयुक्त (ज) कार्यालय
पुणे महानगरपालिका,पुणे-५.
जा.क्र.:-अतिमआ/साप्रवि/आस्था/प्र-३/२८६७
दिनांक :- ०४/०८/२०२०

**-: आज्ञापत्र :-**

विषय :- अभियांत्रिकी संवर्गातील शाखा अभियंता (स्थापत्य) वर्ग-२ या पदावरुन उप अभियंता (स्थापत्य) वर्ग- २ या पदावर तदर्थ पदोन्नती देणेबाबत.

संदर्भ :-
१) मा. महापालिका आयुक्त ठ.क्र. १/०४, दिनांक १५/०४/२०२०.
२) आज्ञापत्र जा.क्र. अतिमआ/साप्रवि/आस्था/प्र-३/५६६, दि.०५/०५/२०२०
३) आज्ञापत्र जा.क्र. अतिमआ/साप्रवि/आस्था/प्र-३/१२४१, दि.०१/०६/२०२०
४) आज्ञापत्र जा.क्र. अतिमआ/साप्रवि/आस्था/प्र-३/२२९५, दि.०९/०७/२०२०
५) मा. अतिरिक्त महा आयुक्त (ज) ठ.क्र.१/२०६, दि. ०४/०८/२०२०

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील "शाखा अभियंता (स्थापत्य)" या पदावरील खालील सेवकाची "उप अभियंता (स्थापत्य)" (वे.श्रे.रु. ९३०० ते ३४८००+ ग्रेड पे ५४०० + मान्य भत्ते) या पदावर पदोन्नतीने नेमणुक करणेबाबत संदर्भ क्र.१ व ५ चे मान्यतेस अनुसरून खालील सेवकांची या आज्ञापत्राच्या दिनांकापासून तदर्थ (Ad-hoc) पदोन्नतीने नेमणुक करण्यात येत आहे.

**" उप अभियंता (स्थापत्य) "**

| अ. क्र. | सेवकाचे नाव | शाखा अभियंता यापदावरील गट | सध्याचे खाते | वेतनाचे खाते | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. गाठे मनोज सुरेश | खुला | पाणीपुरवठा विभाग | पाणीपुरवठा विभाग | शेड्यूलमान्य रिक्त जागी |

१) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र. २७९७/२०१५ मध्ये दिनांक ०४/०८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीमधील आरक्षण अवैध ठरविले आहे. मा. उच्च न्यायालयाच्या विरोधात राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. याबाबत विधी व न्याय विभागाने दि.२८/१२/२०१७ रोजी दिलेल्या अभिप्रायानुसार खुल्या प्रवर्गातील कर्मचा-यांना पदोन्नती देण्यास कोणतीही वैधानिक अडचण नसल्याचे अभिप्राय दिले आहेत. त्यानुसार तूर्तास पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात सेवाज्येष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरण्यात यावीत. अशी कार्यवाही करताना सेवाज्येष्ठता यादीमधील मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती देण्यापूर्वी ते, दिनांक २५/०५/२००४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार आरक्षणाचा लाभ मिळून सेवाज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले नाहीत, याची खात्री प्रत्येक प्रशासकीय विभागाने करावी अशा सूचना सा.प्र.वि./का.१६-ब ने दि.२९/१२/२०१७ च्या पत्रान्वये दिल्या आहेत.

त्यानुसार सदर सेवकांची उप अभियंता (स्थापत्य) पदावरील तदर्थ पदोन्नती मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अधिन असून

पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात देण्यात येत आहे. तसेच खालील अटीच्या अधिन राहून सदर पदोन्नती देण्यात येत आहे :-

| |
|---|
| अ) सदर कर्मचा-यांविरुध्द आदेशाच्या दिनांकापर्यंत कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरु झालेली नाही.<br>ब) या तदर्थ पदोन्नतीमुळे संबंधित कर्मचा-यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.<br>क) मागास प्रवर्गातील कर्मचा-यांची पदोन्नती सदर कर्मचा-यांचे जात वैधता प्रमाणपत्र संबधित जात पडताळणी समितीने निर्गमित केले आहे या अटीच्या अधिन राहून करण्यात येत आहे. |

२) वरील नियुक्त्या मे. राज्य शासनाच्यावतीने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुमती याचिका डायरी क्र. ३३१५१/२०१७ वर मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून, शासन निर्णय दि. २५/०५/२००४ मधील तरतुदीनुसार पदोन्नतीमध्ये आरक्षण देऊन करण्यात येत आहेत.

३) मे. शासनाने जा.क्र.पीएमसी-३०१९/प्र.क्र.३११/नवि-२२, दि.१४.०१.२०२० पत्रास अधीन राहून मा.खातेनिहाय बढती समितीने मान्यता दिलेल्या संभाव्य सेवाजेष्ठता यादीनुसार तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे.

४) कार्यालय परिपत्रक जा. क्र.अतिमआ(इ)/साप्रवि/आस्था/३२०५, दि.२६/०७/२०१९ अन्वये प्रसृत केलेल्या अंतिम सेवाज्येष्ठता याद्यामध्ये उपरोक्त सेवकांना महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियम) नियमावली, १९८२ मधील तरतुदीनुसार कोणताही सेवाजेष्ठतेचा अधिकार राहणार नाही.

५) बढतीने द्यावयाच्या नेमणूकीच्या खात्याचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील. तोपर्यंत सेवकांनी सध्याच्या खात्यातच काम करावे. परंतु त्यांचे वेतन मात्र 'वेतनाचे खाते' या स्तंभाप्रमाणे अदा करण्यात येईल.

६) ज्या सेवकाकडे पदोन्नतीपूर्व (शाखा अभियंता (स्थापत्य)) या पदावर असताना दिलेले सुपूर्त केलेले कामकाज व अतिरिक्त पदभार कायम ठेवण्यात येत आहे.

७) संबंधित सेवकास महानगरपालिका सेवाविनियमानुसार वेतन व अन्य भत्ते आदा करणेत यावेत.

८) या आज्ञापत्रकाची नोंद उपरोक्त सेवकांच्या सेवापुस्तकामध्ये घेण्यात यावी.

तरी, संबंधित खातेप्रमुख यांनी जरूर ती पुढील कार्यवाही करावी.

Rubal 3/8/2020

(रुबल अग्रवाल)

**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)**

पुणे महानगरपालिका

प्रत : संबधित खातेप्रमुख,
पुणे महानगरपालिका.